# मदतीसाठी सरसावले अनेक हात

## पूरग्रस्तांसाठी समाजातील विविध संस्था, संघटनांकडून योगदान

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १७ : पुरानंतर शहर आणि जिल्ह्यातील अनेक ठिकाणी स्वच्छता मोहीम गतीने सुरू झाली आहे. शहरात महापालिकेबरोबर अनेक सामाजिक संघटनांनी यामध्ये योगदान दिले आहे. स्वच्छतेसाठी लागणारे साहित्यसुद्धा अनेकांनी दिले. कचरा व्यवस्थापन करून तो शहराबाहेर हलविला. वैद्यकीय मदतही अनेकांना दिली.

### बीव्हीजी इंडिया प्रा. लि.

पूरग्रस्त क्षेत्रात आतापर्यंत ११०० टन कचरा, अन्य साहित्य गोळा केले. हा सर्व कचरा शहराबाहेर नेला जात आहे. याबरोबर ४२ ते ४३ सापांनाही जीवदान दिले. या सापांना सुरक्षित ठिकाणी नेऊन सोडले. 'बीव्हीजी'मध्ये १२२ कर्मचाऱ्यांची टीम आहे. यामध्ये २० डॉक्टर्स, पाच ॲम्ब्युलन्स, कोल्हापूर आणि सांगलीसाठी ११ ॲम्ब्युलन्स पाठविल्या. अन्य ८५ कर्मचारीसुद्धा कार्यरत आहेत. १५ पर्यवेक्षक, दोन अधिकारी, तीन वरिष्ठ अधिकारी, डीजीएम म्हणून दोन अधिकारी आहेत. 'बीव्हीजी'तर्फे १० तारखेपासून पूरग्रस्त भागात काम सुरू आहे. कालपर्यंत (ता. १४) २२० ते २३० टन कचरा, अन्य साहित्य गोळा केले. यासाठी क्रेडाई संस्था, महापालिका आयुक्त, कर्मचाऱ्यांची साथ लाभली. इचलकरंजीसाठी ३५ टीम आल्या असून सांगलीसाठी ७० ते ७५ टीम पाठविल्या आहेत. अमोल कदम यांच्या अंतर्गत ही स्वच्छता मोहीम सुरू आहे. अध्यक्ष म्हणून हणमंतराव गायकवाड, उपाध्यक्ष उमेशराव माने काम पाहात आहेत.



संग्रहित छायाचित्र.

### कर्तृत्व सामाजिक संघटना

विविध क्षेत्रांतील अभियंत्यांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या कर्तृत्व सामाजिक संघटनेतर्फे पूरग्रस्तांसाठी मदतीची मोहीम राबविली. पूरग्रस्तांचे पुनर्वसन होईपर्यंत ही मोहीम राबविण्यात येईल, असे संस्थापक विराज सरनाईक यांनी सांगितले. विनीत जिर्गे, विशाल शिंदे, सौरभ डिंगणकर, राज कुरणे, शर्वली सरनाईक, दिग्विजय निंबाळकर, स्नेहा सरनाईक, स्नेहल जिर्गे, सुबोध घोरपडे, श्वेता चिटणीस, स्वाती सरनाईक, अनिता ठकार, धैर्यशील नाईक आदी सहभागी झाले.

### इंडोकाऊंट फौंडेशन

पूरग्रस्त ठिकाणी फाऊंडेशनतर्फे चार मोबाईल मेडिकल व्हॅन गेली आठ दिवस कार्यरत राहिली. औषधोपचार पुरविले. व्हॅनमधून तज्ज्ञ डॉक्टर्स, नर्स, फार्मासिस्ट्स, ड्रायव्हर आदी १६ लोकांची टीम कार्यरत होती. बुधवार पेठ, महावीर कॉलेज, सिद्धार्थनगर, नागाळा पार्क, जयंती नाला परिसर, शाहूपुरी, इचलकरंजी, भेंडवडे, इंगळी, लिंगनूर, तळंदगे, कापशी, पट्टणकोडोली, अलाटवाडी, खोची, नेज, कवठेसार, चंदूर अशा पूरग्रस्त भागात सेवा दिली. मुबलक शुद्ध पाणी, ओआरएस, जेवणाची पॅकेट्स, महिलांसाठी सॅनिटरी पॅडस्‌ची सुविधा दिली. कंपनीचे संचालक कमल मित्रा, शैलेश सरनोबत, अशोक माने, रावसाहेब मोरे, अरुण काळे, शाहू भोसले, राजेश मोहिते, पी. एन. देशपांडे, अमोल पाटील, विद्येश नाईक आदी उपस्थित होते.

### फूड व्हॅनची सोय

महावीर महाविद्यालयाचे विद्यार्थी श्रीपाद सुनील ताटे, श्रीपदा ताटे (कसबा बावडा) यांनी फूड व्हॅन तयार केली. जिथे अन्नाची गरज आहे, तिथे अन्न पोहोचवले. स्वच्छता अभियानांतर्गत स्वच्छतेसाठी लागणारे फिनेल, डिटर्जंट सोप, डिटर्जंट पावडर, बर्तन बार, मास्क, हॅण्डग्लोव्हज् आदींचे मोफत वाटप केले.